महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४७७(२)/२०२१/मु.का./वीस दिनांक २० डिसेंबर, २०२२

## -: **प्रसिध्दीपत्रक** :-

**विषय :**- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ मुलाखतीबाबत **(पहिला टप्पा)**
**संदर्भ :**- पूर्व परीक्षा जाहिरात क्र.१०६/२०२१ व मुख्य परीक्षा जाहिरात क्र.३१/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक २८ ऑगस्ट, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांपैकी **पहिल्या टप्प्यातील** मुंबई व नाशिक केंद्रावरील उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २७ ते ३० डिसेंबर, २०२२ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुख्य कार्यालय, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-२१ येथे आयोजित करण्यात आल्या आहेत.

३. मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुलाखत पत्र त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

५. संबंधित उमेदवारांना लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येत आहे.

६. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीच्यावेळी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर करण्याकरिता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

ठिकाण :-मुंबई

उपसचिव (राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,